# प्रेसनोट

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे
दि. २८/०५/२०२२

## सहायक पोलीस निरीक्षक (API) व पोलीस नाईक यांना लाच स्वीकरले प्रकरणी शिक्षा

---

यातील तक्रारदार यांचे विरूद्ध दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं. १०४/१४, भादवि कलम ४०६,४२० प्रमाणे दाखल गुन्ह्यांचे प्रकरण मिटवून देण्यासाठी लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे नोंदविली होती.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांचे विरूद्ध दत्तवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर, गु.र.नं.१०४/१४, भादवि कलम ४०६, ४२० प्रमाणे दाखल गुन्ह्यांचे प्रकरण मिटवून देण्यासाठी दत्तवाडी पोलीस स्टेशनला कार्यरत असणारे विठ्ठल शिवाजी शिंगटे, सहायक पोलीस निरीक्षक व दत्तात्रय विठोबा नाईक, पोलीस नाईक यांनी ५० हजार रूपयांची लाच मागणी करून स्वीकारली त्याप्रकरणी दि. २६/०४/२०१४ रोजी दत्तवाडी पोलीस स्टेशन पुणे शहर येथे दोघांविरूद्ध गुन्हा रजिस्टर नं. ३०७१/२०१४ लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्ह्याचा तपास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे युनिटचे तत्कालीन पोलीस उप अधीक्षक श्री. जे. डी. कळसकर, श्री. पी. एम. मोरे व श्रीमती अनघा देशपांडे यांनी करून विशेष न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले होते.

दि. २७/०५/२०२२ रोजी माननीय विशेष न्यायाधीश श्रीमती एस. व्ही. सहारे, विशेष न्यायालय, शिवाजीनगर, पुणे यांनी सदर खटल्यामध्ये न्यायनिर्णय देवून त्यामध्ये आरोपी लोकसेवक विठ्ठल शिवाजी शिंगटे, सहायक पोलीस निरीक्षक यास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कायदा कलम ७ अन्वये ३ वर्षे सक्त मजुरी व १५ हजार रूपये दंड तसेच आरोपी लोकसेवक दत्तात्रय विठोबा नाईक, पोलीस नाईक यास भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कायदा कलम १२ अन्वये ३ वर्षे सक्त मजुरी व १५ हजार रूपये दंड अशी शिक्षा सुनावली आहे.

सरकारतर्फे सदर खटल्याचे कामकाज विशेष सरकारी अभियोक्ता श्री. माधव पौळ, श्री. प्रेमकुमार अगरवाल, श्री. चंद्रकिरण साळवी यांनी पाहिले व त्यांना अभियोगासाठी पैरवी पोलीस नाईक जगदिश कस्तुरे व पोलीस हवालदार अतुल फरांदे यांनी मदत केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकवर संपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००.
५. ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६. वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७. ऑनलाईन ॲप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.